## जैविक विविधता व्यवस्थापन समित्या

प्रत्येक गावातील स्थानिक लोकांच्या सहभागातून जैविक विविधता व्यवस्थापन समित्या स्थापन केल्या जातात. या समित्या ग्रामसभेच्या उपसमित्या म्हणून स्थापन केल्या जातात. ग्रामसभेने निवडलेल्या सात व्यक्तींचा त्यात समावेश असतो. त्यात १/३ महिला असतात. या समितीच्या कामामध्ये प्रमुख योगदान देऊ शकणाऱ्या वनस्पती तज्ञ, शेतकरी, व्यापारी व्यक्ती यात सदस्य म्हणून काम करतात. जैविक साधनसंपत्तीचे संवर्धन, ते टिकून राहील अशा प्रकारे त्यांचा वापर आणि जैविक विविधतेतून प्राप्त होणाऱ्या लाभांचे न्याय्य वाटप निश्चित करणे हे जैव विविधता समितीचे प्रमुख कार्य आहे. याशिवाय लोक जैविक विविधता नोंदवही तयार करण्याचे कामही या व्यवस्थापन समितीस करावे लागते. याशिवाय प्राणी, सूक्ष्म जीवजंतू, वृक्ष, वारसा स्थळे, वनराई, देवराई, जलकुंड इत्यादींचे व्यवस्थापन करणेही अपेक्षित आहे. अतिविशिष्ट परिसरातील महत्त्वाच्या वनस्पती, प्राण्यांच्या जाती यांचे संवर्धन करणे जैव विविधतेबाबत जागरूकता निर्माण करणे ही समितीची प्रमुख कार्ये आहेत. ही व्यवस्थापन समिती वर्षातून चार सभा घेईल. किमान तीन महिन्यातून एक सभा आयोजित केली जाईल.

## जैवविविधता व्यवस्थापन समित्यांची भूमिका आणि कार्य



पर्यावरणाचा समतोल राखून गावाचा विकास साधण्यासाठी गावपातळीवर जैवविविधता समित्यांची स्थापना करण्यात येते. महाराष्ट्र राज्य जैविक विविधता नियम २००८ नुसार या समित्यांची स्थापना करण्यात येत असल्याने समित्यांना काही अधिकार देण्यात आले आहेत तसेच त्यांची कार्येही नियमात नोंद करण्यात आली आहेत.

## समितीची रचना

- ग्रामसभेच्या माध्यमातून समितीची स्थापना करण्यात येईल.
- सात व्यक्ती समितीवर निवडल्या जातील. आठवी व्यक्ती ग्रामसेवक असून ती या समितीचा सचिव असेल. त्यातून लोकशाही मार्गाने अध्यक्षाची निवड होईल.
- समितीत किमान एकतृतीयांश महिला असणे आवश्यक आहे.
- अनुसूचित जमाती अनुसूचित जातीच्या सदस्यांचा सहभाग आवश्यक असेल.
- वनस्पतीतज्ञ, शेतकरी, वनौषधी संकलक, व्यापारी, मच्छिमार, वैदू आदींचे प्रतिनिधी समितीत समाविष्ट असतील.
- विधानसभेचे स्थानिक सदस्य, संसद सदस्य, पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषद सदस्य निमंत्रित सदस्य असतील.

## भूमिका

- ग्रामसभेच्या माध्यमातून जैवविविधता व्यवस्थापन समिती अस्तित्वात येईल. तिचा कार्यकाळ पाच वर्षांचा राहील.
- समिती अस्तित्वात येताच सर्वप्रथम गाव व परिसरातील जैवविविधतेची नोंद करावयाची आहे. लोक जैवविविधता नोंदवही तयार करून त्यात सर्व नोंदी घेतल्या जातील.
- नष्ट होत चाललेल्या जैवविविधतेची पुनर्स्थापना करण्याचे प्रयत्न समिती करेल.
- गावाची पर्यावरणविषयक माहिती, पारंपरिक ज्ञान यांची देवघेव राज्य जैव विविधता मंडळास माहिती देणे.
- गावाच्या परिसरातील वारसा वृक्ष, प्राणी, सूक्ष्म जीवजंतू, वनराई, जलस्रोत यांचे संरक्षण समिती करेल.
- लोक जैवविविधता नोंदवहीत दिलेल्या माहितीच्या आधारावर प्रत्येक समितीची कामाची पद्धत तयार होईल.
- कामाचा आराखडा तयार करताना स्थानिक जैवविविधतेच्या संरक्षणाबरोबरच लोकशिक्षणासाठी समिती प्रयत्न करेल.
- स्थानिक जैवविविधतेचा सर्वांना समान उपयोग व्हावा यासाठी प्रयत्न करणे. विशेषतः औषधी वनस्पती व त्यांच्याशी संबंधित पारंपरिक ज्ञान यांची सांगड घालून सूक्ष्म व्यवस्थापन आराखडा तयार करेल.
- अतिविशिष्टच्या महत्त्वाच्या जाती व प्राण्यांच्या पारंपरागत जातींचे/ प्रकारांचे संवर्धन करणे.
- लोक जैविक नोंदवही मध्ये असणाऱ्या पारंपरिक ज्ञानाचे जतन करणे.

दिलासा जनविकास प्रतिष्ठान
[illegible]




# जैवविविधता

### दिलासा संस्थेचा परिचय

खेड्यांचा विकास हाच एक ध्यास घेऊन गेली २५ वर्षे दिलासा जनविकास प्रतिष्ठान ही संस्था पाणी, महिला सक्षमीकरण, प्रशिक्षण, कृषी विकास, उपजीविका विकास, शेतकऱ्यांचे संघटन आणि त्यांच्या कंपन्यांची स्थापना या विविध क्षेत्रात कार्य करीत आहे. उत्तर महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा या विभागातील अत्यंत दुर्लक्षित, आडवळणाच्या विकासापासून दूर असलेल्या ४२८४ खेड्यांमध्ये संस्थेने विविध प्रकल्प राबविले. ग्रामीण विकास, पाणलोट क्षेत्र विकास, महिला सक्षमीकरण यातील गौरवास्पद कामाबद्दल संस्थेला राज्यस्तरीय, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. औरंगाबाद जिल्ह्याच्या फुलंब्री तालुक्यातील ३० गावांमध्ये संस्था जैविक विविधता व्यवस्थापन समित्यांचे संघटन आणि क्षमता बांधणी हे काम करीत आहे. यातील भागात जैवविविधता या विषयाची लोकजागृती करून देण्यात आलेली आहे. तसेच जैविक विविधता व्यवस्थापन समितीच्या कार्याविषयी माहिती दिलेली आहे.

## प्रास्ताविक

जीवन सुखी होण्यासाठी निसर्गाने मानवाला अनेक प्रकारची संपत्ती दिली आहे. अन्न, हवा, पाणी, प्रकाश इत्यादी. जैव विविधता हा मानवाला निसर्गाने दिलेला मौल्यवान ठेवा तर आहेच शिवाय जैवविविधता हे मानवाला पृथ्वीवर जिवंत ठेवणारे महत्त्वाचे नैसर्गिक भांडार आहे. **एका विशिष्ट वातावरणात वेगळ्या प्रकारच्या आणि वेगळ्या संख्येच्या सजीवांनी एकत्रित राहणे म्हणजे जैव विविधता होय.**

या विविधतेमुळेच आपल्याला अन्न, वस्त्र, लाकूड, ऊर्जा, हवा मिळते. मानवाची अन्नसुरक्षितता ही जैव विविधतेवर अवलंबून आहे. निसर्गाशिवाय मानवाचे संपूर्ण जीवन अपूर्ण आहे. किंबहुना मानवाचे अस्तित्वच निसर्गावर अवलंबून आहे. हजारो वर्षांपासून निसर्ग आणि मानव यांचा अतूट संबंध आहे. मानवाला त्यापासून वेगळे करता येणे शक्य नाही. निसर्गाचा नाश म्हणजेच मानवजातीचा नाश.

